## पुष्प – ४ : वैष्णवरीत

### विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म

१. वैष्णवांचा म्हणजेच वारकऱ्यांचा धर्म कोणता...? धर्म म्हणजे काय...?: एकनाथमहाराजांची कथा : पाण्यात पडलेला विंचू : प्रेम आणि समता जगणे हाच वैष्णवांचा धर्म. कोणताही भेद, विषमता, पिळवणूक हाच अधर्म.

२. भेदाभेद अमंगळ तर मग मंगल काय...? : नामस्मरण हे मंगल वातावरण, वृत्ती निर्माण करण्यासाठीच : श्रीविठ्ठल हेच मंगलाचे सार.

३. एकनाथमहाराजांचे जीवनचरित्र : गाढवाला पाणी पाजणे :

*************************************************

### संतबोल

- विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ।। (श्रीतुकोबाराय)
- सकळ मंगळनिधी। श्री विठ्ठलाचें नाम आधीं।। (श्रीज्ञानोबाराय)
- सर्व मंगळाचें सार। मुख सिद्धीचें भांडार।। (श्रीतुकोबाराय)
- हें चि आम्हां करणें काम। बीज वाढवावें नाम।। (श्रीतुकोबाराय)
- विठोबाचा धर्म जागो। त्याचे चरणीं लक्ष लागो गा।। (श्रीनामदेवराय)
- वर्षत सकळ मंगळीं। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी। अनवरत भूमंडळी। भेटतु भूतां।। (ज्ञा. १८.१७९६)

**मंजिरी – ४**

१. 'विष्णू' हे तत्त्व आणि त्याचा अर्थ.

२. विष्णू तत्त्वाचे सर्वसमावेशकत्व, व्यापकपण, विस्तारशीलता.

३. आपला प्रत्येक व्यवहार 'विठ्ठल'तत्वाशी आहे या भावनेने जगणे म्हणजे वैष्णव धर्माचे आचरण.

************************************************

**संतबोल**

- आंत हरि बाहेर हरि। हरिनें घरीं कोंडिले।। (श्रीतुकोबाराय)
- काय आम्ही भक्ति करणें कैसी। काय एक वाहावें तुम्हांसी।
  अवघा भरोनि उरलासी। वाणीं खाणीं रसीं रूपीं गंधीं।। (श्रीतुकोबाराय)
- हरी पाहिला रे हरी पाहिला रे। सबाह्याभ्यंतरीं अवघा व्यापक मुरारी।। (श्रीज्ञानोबाराय)
- हें असो आणिक कांहीं। तया सर्वत्र मीवांचूनि नाहीं। जैसें सबाह्य जळ डोहीं। बुडालिया घटा।। (ज्ञा. ७.१३३)
- जेणें जग हें समस्त। आंत बाहेरी पूर्ण भरित। जालें आहे दीपजात। तेजें जैसें।। (ज्ञा. १८.९१६)